राज्य सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" करिता इंन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करणे

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२६/ई ६६९४६४ / वि शि ५**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक - २५/०२/२०२६

**संदर्भ : -** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५ दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३

२ ) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५ दिनांक २८ नोव्हेंबर , २०२३

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र. १ अन्वये दि. १६ ऑक्टोंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयांद्वारे राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance ) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance ) योजना लागू करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये दि. २८ नोव्हेंबर , २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या विमा योजनेचे "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" असे नामकरण करण्यात आले आहे.

प्रस्तुत "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या स्वरुपात बदल करण्याचे तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील ३ वर्षाकरीता इंन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी **वैयक्तीक अपघात विमा** (Personal Accident Insurance ) **याद्वारे "अनिवार्य" करण्यात येत आहे.** मात्र ज्या विद्यापीठाकडील विमा योजनेद्वारे कमी रकमेच्या हप्त्यातून यापेक्षा जास्त रकमेचे संरक्षण मिळत असेल तर त्याबाबत नोडल अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण

संचालनालय, पुणे यांच्या सहमतीने त्या विद्यापीठास त्यांची योजना चालू ठेवता येईल. तथापी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी **वैद्यकीय विमा** (Medical Insurance ) **पुर्वीप्रमाणेच "पूर्णपणे ऐच्छिक" असेल.**

२. वरील सुधारणेसहित **"शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील ३ वर्षाकरीता इन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रीया सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.** त्यानुसार पुढील कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी करावी व याबाबतचा उचित प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर करावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०२२५११५२१३१३०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.02.25 11:53:36 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई .
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय , मुंबई .
४) मा. उपमुख्यमंत्री (राउशु , क्रिडा) यांचे सचिव, मंत्रालय , मुंबई .
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
६) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
७) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर.
९) महालेखापाल (लेखा परीक्षा)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर.
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
११) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) संचालक, कला संचालनालय, मुंबई.
१४) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
१५) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१६) विमा संचालक, विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन (म्हाडा), वान्द्रे (पूर्व), मुंबई.
१७) जिल्हा कोषाधिकारी, पुणे.
१८) निवड नस्ती (विशि-५).